Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास

**डॉ. गजानन मुरलीधर खेकाडे**
सहायक प्राध्यापक
एम. ए. अर्थशास्त्र, सेट (अर्थशास्त्र), एम.एड. पीएच.डी.
आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर

**सारांश—**

उच्च शिक्षणातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास सर्वेक्षण पध्दतीने केला आहे. सहेतूक नमुना निवड पध्दतीने एकूण १२० विद्यार्थ्यांची निवड संशोधनासाठी केली होती. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलनाईन परीक्षेविषयीचा दृष्टिकोनाचे मापन करण्यासाठी संशोधकाच्या स्वनिर्मित ऑनलाईन परीक्षाविषयक दृष्टिकोन या शोधिकेचा अवलंब केला होता. संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता. निष्कर्षः उच्चशिक्षणातील अधिकतर विद्यार्थी ऑनलाईन परीक्षाबाबत सकारात्मक दिसून येतात. तसेच कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक दिसून येतो. तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा कला शाखेतील विद्यार्थी हे अधिक सकारात्मक दिसून येतात.

**प्रस्तावना—**

अध्ययन आणि अध्यापन प्रक्रिया प्रभावी होणे हे शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्ही घटकांवर अवलंबून आहे. शिक्षणात अध्ययन आणि अध्यापन झाल्यानंतर त्याचे मूल्यमापन होण्यासाठी परीक्षा घेतली जाते. परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन करीत असते. म्हणून आजमितीस अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन या तिन्ही गोष्टींना विशेष महत्त्व दिल जाते. भारतात शैक्षणिक स्तरावर लेखी परीक्षाद्वारे मूल्यमापन केले जात असते. विद्यार्थ्यांनी शाळेत यावे वर्गात बसून परीक्षा द्यावी आणि शिक्षकांनी त्यांच्या परीक्षेचे मूल्यमापन करावे. या परिस्थितीची सर्वानाच आता चांगलीच माहिती झाली आहे आणि सवय ही पडली आहे. कोवीड—१९ च्या भयावय स्थितीत संपूर्ण शाळा, महाविद्यालये बंद करावी लागली आणि मुलांना आपल्या शैक्षणिक प्रगतीत मागे पडू न देता त्यांची प्रगती सतत चालू ठेवण्यासाठी ऑनलाईन अध्यापनाची व्यवस्था करण्यात आली. अनेक मार्ग शिक्षकांसमोर उभे राहिले, अनेक अडचणींना सामोरे जावे लागले परंतु काही कालावधीनंतर सर्वच शिक्षक ऑनलाईन अध्यापनासाठी सक्षम झाले आणि पालकही आपल्या मुलांना तशा सोयी सुविधा पुरवू लागले. यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ आणि प्रभावी होण्यास मदत झाली. अभ्यासक्रम पूर्ण होत होते. कोवीड १९ परिस्थिती आजही संपलेली नाही. कदाचित आणखी एक वर्ष विद्यार्थ्यांना ऑनलाईन वर्गात उपस्थित राहावे लागेल आणि तशी मानसिकता ही आज तयार झाली आहे.

यानंतर प्रश्न उरतो तो म्हणजे मूल्यमापनाचा या मुलांना पुढच्या वर्गात बढती कशी द्यावी असा यक्ष प्रश्न सर्वच शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांसमोर पडला. शासनाने माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तरावर मुलांना परीक्षा न घेताच बढती दिली. परंतु महाविद्यालयातील अनेक अभ्यासक्रमाना अशी बढती देणे हे योग्य नसल्याने त्यांना ऑनलाईन परीक्षा देणे अनिवार्य झाले. प्रथमच या गोष्टीला सामोरे जाताना मुलांच्या मनात तणाव निर्माण झाला असेल. कारण मुलांना परीक्षा देण्याची वेगळी सवय होती. अभ्यास त्यांनी थेअरी पेपरसाठी केला होता. अशा मोठया समस्यांना सामोरे जावून सर्वच विद्यापीठ स्तरीय विद्यार्थी ऑनलाईन परीक्षेसाठी तयार झाले आणि परीक्षाही दिली. त्यांच्या निकाल लागलाही. अनेक मुले चांगल्या गुणांनी उत्तीर्ण देखील झाले. त्यांच्या या परीक्षेविषयी असलेले मत जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच प्रस्तुत संशोधनात उच्च शिक्षणातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**समस्या विधान—** उच्च शिक्षणातील वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.
२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.
४. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.

**संशोधन पध्दती—**

प्रस्तुत संशोधनात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाचा सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला होता.

**जनसंख्या—**

प्रस्तुत संशोधनासाठी शिरपूर तालुक्यातील वरिष्ठ महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेच्या अंतिम वर्षाला प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती.

**न्यादर्श—**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने सहेतूक नमुना निवड पध्दतीने एकूण १२० विद्यार्थ्यांची निवड संशोधनासाठी केली होती ती खालीलप्रमाणे...

**तक्ता क्रमांक ०१**

**वरिष्ठ महाविद्यालयातील निवड केलेला न्यादर्श**

| | कला | विज्ञान | वाणिज्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | २० | २० | २० | ६० |
| विद्यार्थीनी | २० | २० | २० | ६० |
| | | | एकूण | १२० |

**संशोधनाचे साधन—**

प्रस्तुत संशोधनात वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलनाईन परीक्षेविषयीचा दृष्टिकोनाचे मापन करण्यासाठी संशोधकाच्या स्वनिर्मित ऑनलाईन परीक्षाविषयक दृष्टिकोन या शोधिकेचा अवलंब केला होता. या शोधिकेत सकारात्मक व नकारात्मक दृष्टिकोनावर आधारीतएकूण ११ विधाने होती. विद्यार्थ्यांना प्रतिसाद देण्यासाठी होय, नाही व सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते. ही शोधिका तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून तपासून घेण्यात आली होती.

**संख्याशास्त्रीय परिमाणे—**

प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारी, मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन—**

प्रस्तुत संशोधनात विद्यार्थ्यांनी परीक्षा विषयक दृष्टिकोन शोधिकेला दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढीलप्रमाणे परीकल्पना परीक्षण करुन निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**परिकल्पना परीक्षण**

**१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.**

प्रस्तुत परिकल्पनेचे परीक्षण करण्यासाठी संशोधकाने पुढीलप्रमाणे मतांची टक्केवारी काढून निष्कर्ष मांडला आहे.

तक्ता क्रमांक ०२
वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन

| दृष्टिकोन | प्रतिसाद | टक्केवारी |
|---|---|---|
| सकारात्मक दृष्टिकोन | ८८ | ७३ |
| नकारात्मक दृष्टिकोन | ३२ | २७ |
| एकूण | १२० | १०० |

**निरीक्षण:** तक्ता क्रमांक ०२ वरून असे दिसून येते की,

- ऑनलाईन परीक्षाविषयी ७३ टक्के विद्यार्थ्यांचा सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो
- ऑनलाईन परीक्षाविषयी २७ टक्के विद्यार्थ्यांचा नकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो

**निष्कर्ष:**यावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील अधिकतर विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

**२. वरिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ४० | १४.२१ | १.७८ | २.०० | ३.४४ | त्याग |
| विज्ञान | ४० | १५.४४ | १.३४ | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन—**

स्वाधीनता मात्रा (७८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार ‘t’ मूल्य २.०० आहे. प्राप्त ‘t’ मूल्य ३.४४ असून ते नमुना ‘t’ मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१५.४४) हा कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१४.२१) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन कला शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.

**३. वरिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| कला | ४० | १४.२१ | १.७८ | २.०० | ७.९८ | त्याग |
| वणिज्य | ४० | १२.४८ | १.९७ | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन—**

स्वाधीनता मात्रा (७८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार ‘t’ मूल्य २.०० आहे. प्राप्त ‘t’ मूल्य ७.९८ असून ते नमुना ‘t’ मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. कला शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१४.२१) हा वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१२.४८) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कला शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.

**४. वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येत नाही.**

| शाखा | संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| विज्ञान | ४० | १५.४४ | १.३४ | २.०० | १५.२१ | त्याग |
| वणिज्य | ४० | १२.४८ | १.९७ | | | |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन—**

स्वाधीनता मात्रा (७८) साठी ०.०५ सार्थकता स्तरावर संख्याशास्त्रीय सारणी नूसार 't' मूल्य २.०० आहे. प्राप्त 't' मूल्य १५.२१ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी असलेल्या दृष्टिकोनाच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१४.४४) हा वाणिज्यशाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१२.४८) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.

**निष्कर्ष**

१. वरिष्ठ महाविद्यालयातील कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील अधिकतर विद्यार्थ्यांचा (७४ टक्के) ऑनलाईन परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.
२. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१५.४४) हा कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१४.२१) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन कला शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.
३. कला शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१४.२१) हा वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१२.४८) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कला शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.
४. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा मध्यमान गुणांक (१४.४४) हा वाणिज्यशाखेतील विद्यार्थ्यांच्या मध्यमान गुणांकांपेक्षा (१२.४८) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षेविषयी दृष्टिकोन वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक सकारात्मक दिसून येतो.

**चर्चा—** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांचा ऑनलाईन परीक्षाविषयक दृष्टिकोनाचा तुलनात्मक अभ्यास केला होता. त्यात उच्चशिक्षणातील अधिकतर विद्यार्थी ऑनलाईन परीक्षाबाबत सकारात्मक दिसून येतात. तसेच कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक दिसून येतो. तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांपेक्षा कला शाखेतील विद्यार्थी हे अधिक सकारात्मक दिसून येतात. हा निष्कर्ष आजच्या कोवीड १९ च्या परिस्थितीत चांगला माणला पाहिजे कारण अनेक विद्यार्थ्यांनी याकडे नकारात्मक दृष्टिकोनाने न पाहता, याचा कोणताही ताण न घेता याला सामोरे जाण्याची क्षमता दाखविली ही एक मोठी बाब मानली पाहिजे. ही क्षमता टिकवून ठेवण्यासाठी या विद्यार्थ्याचें सतत मार्गदर्शन, समुपदेशन केले पाहिजे. प्रेरणा दिल्या पाहिजे. त्यांच्या उत्साह निर्माण केला पाहिजे. हे कार्य शिक्षक, पालक आणि प्रशासन चांगल्या पध्दतीने करु शकते.

**ग्रंथसूची**

कदम चा. प. (१९९७). *शैक्षणिक संख्याशास्त्र.* पुणे: विद्या प्रकाशन.
पंडित, ब.बी. (२००५). *शिक्षणातील संशोधन.* पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
मुळे आणि उमाठे. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* नागपूर: महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ.
Best, J.W. and Khan, K.M. (2002) *Research in Education.* New Delhi: Practice Hall of India.
Kothari, C. R. (1990) *Research Methodology, Methods and Techniques.* New Delhi: Wiley Eastern Limited.
Sharma, R.A. (2001). *Essentials of Measurement in Education and Psychology.* Meerut: Surya Publication.